# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कापुस संशोधन केंद्र, नांदेड | १ |
| २ | ज्वार संशोधन केंद्र, परभणी | ३ |
| ३ | कृषि संशोधन केंद्र, ता. बदनापुर जि. जालना | ४ |
| ४ | फळ संशोधन केंद्र, हिमायतबाग, छ. संभाजीनगर | ७ |
| ५ | गळितधान्ये संशोधन केंद्र, लातूर, ता. जि. लातूर | ८ |
| ६ | कृषि संशोधन केंद्र, तुळजापुर, जि. धाराशिव | १० |
| ७ | सिताफळ संशोधन केंद्र, अंबाजोगाई, जि. बीड | ११ |
| ८ | मोसंबी संशोधन केंद्र, ता. बदनापुर, जि. जालना | १३ |
| ९ | केळी संशोधन केंद्र, नांदेड | १४ |
| १० | कापुस संशोधन केंद्र, महेबुब बाग फार्म, परभणी | १५ |
| ११ | बाजरा संशोधन केंद्र, वैजापूर, जि. छ. संभाजीनगर | १६ |
| १२ | कृषि संशोधन केंद्र, सोमनाथपूर, ता. उदगीर, जि. लातुर | १८ |
| १३ | बीजतंत्र संशोधन केंद्र व पैदासकार बियाणे विभाग, परभणी | १९ |
| १४ | प्रादेशिक ऊस संशोधन केंद्र, वसमतनगर, ता. वसमत, जि. हिंगोली | २२ |
| १५ | मध्यवर्ती परिसर, वनामकृवि, परभणी | २४ |
| १६ | गळितधान्ये संशोधन उप केंद्र, अंबाजोगाई, जि. बीड | २५ |
| १७ | मका संशोधन केंद्र, सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर | २६ |
| १८ | सोयाबीन संशोधन, प्रशिक्षण व प्रक्रिया उपकेंद्र, धर्मापुरी, परळी वैजनाथ, जि. बीड | २७ |

# संशोधन केंद्रे

## १. कापूस संशोधन केंद्र, नांदेड

१. संशोधन केंद्राचे नाव व पत्ता : कापूस संशोधन केंद्र, बाफना टी पॉइंट जवळ, देगलूर रोड, नांदेड

२. स्थापना वर्ष : १९४१

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र व इतर सुविधा : क्षेत्र : ४९.०६ हेक्टर

इतर सुविधा : सुसज्ज इमारत, कपाशीच्या धाग्याचे गुणधर्म तपासणी प्रयोगशाळा, जैविक बुरशीनाशक उत्पादन प्रयोगशाळा, ग्रंथालय, शेतीकामासाठी ट्रॅक्टर व अनुषांगीक विविध औजारे

४. मनुष्यबळ : (प्रकल्प निहाय मंजूर, सद्या भरलेली व रिक्त पदे)

मंजूर पदे :६४ सद्या भरलेली पदे :२४ रिक्त पदे :४२

५. संशोधन केंद्राचा मूळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदल

१) राज्यातील कापूस लागवड क्षेत्रासाठी देशी कपाशीचे अधिक उत्पादनक्षम, धाग्याचे सरस गुणधर्म असणारे वाण विकसीत करणे.

२) अमेरिकन कपाशीचे अधिक उत्पादनक्षम, धाग्याचे सरस गुणधर्म असणारे सरळ व संकरीत वाण विकसीत करणे.

३) विभाग व हवामान निहाय आणि गरजेनुरूप कापूस पीक उत्पादन तंत्रज्ञान विकसीत करणे.

४) विभागातील विविध कीड व रोगांचा अभ्यास करणे आणि त्यांचेसाठी कीड-रोग नियंत्रण तंत्रज्ञान विकसीत करणे.

५) विकसीत वाणांचे केंद्रीय व पैदासकार बिजोत्पादन घेणे आणि विविध घटकांना मोठ्या प्रमाणात बिजोत्पादन घेण्यासाठी उपलब्ध करणे.

६) शेतकरी, विस्तार कार्यकर्ते, ई यांना तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी मार्गदर्शन करणे

६. पूर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प :

पूर्ण झालेले प्रकल्प :09 चालू असलेले प्रकल्प :01

७. केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम :

**बिजोत्पादन :** प्रमुख खरीप (कापूस, सोयाबीन, बाजरी, ई.) व रबी (हरभरा, ज्वारी, करडई, ई.) पीकांचे सरासरी २० हेक्टर क्षेत्रावर पैदासकार स्तरावरील बिजोत्पादन.

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरून केलेल्या / केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारशी / उपलब्धी

**वाण :** बीटी कापूस वाण -: एनएचएच ४४ (बीजी २) , अमेरिकन सरळ वाण - एनएच ६७७

**शिफारशी :०४**

९. शेतकऱ्यांच्या सध्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरू असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत? यासंबधी सुचना.

१) कापूस पीकामध्ये यांत्रिकीकरण बाबत संशोधन

२) जैवतंत्रज्ञानाचा वापर करून जैविक व अजैविक ताणास प्रतिकारक / सहनशील वाण तयार करणे

३) खतांची कार्यक्षमता वाढविणेसाठी नॅनोतंत्रज्ञानाचा वापर करून अन्नद्रव्य व्यवस्थापन

४) जैविक कीडनाशकांची निर्मिती करून शेतकऱ्यांना उपलब्ध करणे

५) सरकीमध्ये तेलाचे अधिक प्रमाण आणि गॉसीपॉल घटकाचे प्रमाण कमी असणाऱ्या वाणांची निर्मिती करणे

६) हवामान बदलानुसार नविन कीड - रोग व्यवस्थापनविषयी संशोधन

१०) संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाह्य झालेला नॉन प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करून उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा.

**संशोधन प्रकल्प**

**प्रकल्प १ : बीटी कापूस संदर्भ प्रयोगशाळा प्रकल्प**

**उद्देश :** सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रातील बीटी बियाणे कंपन्यामार्फत निर्मित बीटी बियाणे संदर्भातील बीटी जनुक बाबत समस्यांचे निराकरण करणे.

निधीची आवश्यकता : २५ कोटी (२०२४-२९)

लागणारे मनुष्यबळ :

- शास्त्रज्ञ (कृषि जैवतंत्रज्ञान) : 02
- सहायक कर्मचारी (वरिष्ठ / कनिष्ठ संशोधन सहायक, प्रयोगशाळा सहायक, लिपीक, मजूर / शिपाई): 10

**प्रकल्प २ : कापूस प्रक्रिया उद्योग**

**उद्देश :** कपाशीपासून तयार होणारे पराठी पासून हार्डबोर्ड, हार्डबोर्ड, ईंधन व मशरूम आणि सरकीपासून तेल व अन्य खाद्यपदार्थ उत्पादनासाठी संशोधन करून तंत्रज्ञान विकसीत करणे.

**निधीची आवश्यकता :** ५० कोटी (२०२४-२९)

**मनुष्यबळ :**

- शास्त्रज्ञ (कृषि अभियांत्रिकी / अन्न प्रक्रिया) : 0३
- सहायक कर्मचारी (वरिष्ठ / कनिष्ठ संशोधन सहायक, लिपीक, मजूर / शिपाई) : १२

**नविन मनुष्यबळाची व निधीची गरज :** सद्यस्थितीमध्ये संशोधन केंद्रावर चालू असलेले कार्य आणि प्रस्तावीत प्रकल्प यांचे कार्यामध्ये पूर्णत: विभिन्नता असल्यामुळे नविन प्रकल्पांकरिता नव्याने मनुष्यबळाची व निधीची आवश्यकता आहे.

## २. ज्वार संशोधन केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

१. संशोधन केंद्राचे नाव व पत्ता :- ज्वार संशोधन केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

२. स्थापना वर्ष :- १९२८

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा :-

जमिन : ५० हेक्टर, कार्यालयीन इमारत : ०१, संशोधन प्रयोग शाळा : ०४, गोडाऊन : ०२, प्रक्षेत्राची इमारत : ०२, विहीरी : ०२ व शेततळे : ०१ इत्यादी

४. मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजूर, सद्या भरलेली व रिक्त पदे)

| अ क्रं | प्रकल्पाचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | इंन्टेन्सीफिकेशन ऑफ रिसर्च वर्क फॉर मिलेट ॲन्ड पल्सेस | ११२ | ३१ | ८१ |
| २ | सायंटिफिक वर्क फॉर इंम्प्रुमेंन्ट ऑफ सिरीयल्स (ऑदर दॅन राईस पल्सेस) | ०५ | ०३ | ०२ |
| ३ | रिसर्च फॉर्म (स्किम फॉर एक्सप्रिमेंटल फॉर्म) | ०५ | ०३ | ०२ |
| ४ | स्वरगम मिलेट्स स्पेशालिस्ट (ज्वार विशेषज्ञ, ज्वार संशोधन केंद्र) | ०३ | ०३ | ०० |

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदल

१. खरीप व रब्बी ज्वारीचे राज्यस्तरावरील चाचणी प्रयोग घेणे
२. रब्बी ज्वारीचे विद्यापीठ स्तरावरिल चाचणी प्रयोग घेणे
३. खरीप व रब्बी ज्वारीचे संकरित व सरळ वाण तयार करणे (संकरण पध्दतीने)
४. खरीप व रब्बी ज्वारीचे संकरित व सरळ वाण प्रसारित करणे

६. पुर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प

- पुर्ण झालेले प्रयोग – निरंक
- कार्यरत असलेले प्रकल्प-०४

७. केंद्रावर चालू असलेले इतरत्र उपक्रम उदा. बिजोत्पादन, रोपवाटिका इ.

१. ट्रायकोडर्मा युक्त ट्रायकोबुस्ट या जैविक बुरशीनाशकाचे उत्पादन करणे
२. खरीप व रब्बी हंगामामध्ये ज्वारीच्या लागवड तंत्रज्ञानाबद्दल शेतक-यांना मार्गदर्शन करणे व त्यांच्या शंका समाधान करणे
३. खरीप हंगामामध्ये मुग, उडीद व तुर या पिकाचे राज्यस्तरीय बहुक्षेत्रीय चाचणी प्रयोग घेणे
४. ज्वारीवरील किडीसाठी ट्रायकोकार्ड उत्पादन करणे

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या / केंद्राचा सहभाग असणा-या महत्वाच्या शिफारसी / उपलब्धी

१. प्रसारित झालेले वाण -परभणी शक्ती, परभणी सुपर मोती, परभणी वसंत (हूरडा), परभणी शक्ती संशोधन शिफारशी -०३

९. शेतक-यांच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत या सबंधी सूचना

१. वाढत्या पर्यटन व्यवस्थेमुळे खरीप व रब्बी हंगामामध्ये ज्वारीच्या हूरडयास शेतक-याकडुन मागणी होत असल्यामुळे हूरडयाचे नवीन वाण निर्माण करणे
२. महाराष्ट्रातील रब्बी ज्वारीचे क्षेत्र स्थिर असल्यामुळे वेगवेगळे संकरित व सरळ वाण निर्मीती करणे

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाहय झालेला नॉन – प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करुन उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लोख करावा. – निरंक

## ३. कृषि संशोधन केंद्र, बदनापूर

१. संशोधन केंद्राचे नाव व पत्ताः कृषि संशोधन केंद्र, बदनापूर

२. स्थापना वर्षः १९५१

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि ईतर सुविधा :

- क्षेत्र ६४.८२ हे. , २ ट्रॅक्टर मोठे, २ ट्रॅक्टर मिनी सर्व आवश्यक यंत्र सामग्रीसह.
- बियाणे साठवणूक गृह, तुषार सिंचन संच, ०३ विहीर, ०३ बोअरवेल विद्युत पंपासह, हवामानशास्त्र वेधशाळा

४. मनुष्य बळ (प्रकल्पनिहाय मंजूर, सध्या भरलेली व रिक्त पदे):

योजना निहाय (राज्य योजना २४१५) आस्थापनेची माहिती

| योजनेचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| दाळवर्गीय संशोधन योजना,कृषि संशोधन केंद्र, बदनापूर, जि.जालना | १५ | ०६ | ०९ |
| गहू व ज्वार योजना,कृषि संशोधन केंद्र, बदनापूर, जि.जालना | ७२ | १९ | ५२ |
| कापुस सुधार योजना,कृषि संशोधन केंद्र, बदनापूर, जि.जालना | १८ | ०२ | १६ |
| तेलबिया सुधार योजना,कृषि संशोधन केंद्र, बदनापूर, जि.जालना | १८ | ०४ | १४ |
| राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प टप्पा -१ (NARP) योजना,कृषि संशोधन केंद्र, बदनापूर, जि.जालना | ०१ | ०१ | ०० |
| **एकुण** | **१२४** | **३२** | **९१** |

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदलः

संशोधन केंद्राचा मुळ उद्देशः

- अधिक उत्पादन, लवकर व मध्यम कालावधीत तयार होणा-या दाळवर्गीय पिकांच्या सुधारीत व संकरीत वाणांची निर्मिती करणे.
- दाळवर्गीय पिकांतील मर व वांझ रोगास प्रतिकारक दाते वाणांची निर्मिती करणे.
- दाळवर्गीय पिकांतील अधिक उत्पादन, किड व रोगप्रतिकारक वाणांची निर्मिती करणे.
- दाळवर्गीय पिकांतील मायक्रोफोमिनाचा करपा, पिवळा केवडा व भुरी रोगास प्रतिकारक दाते वाणांची निर्मिती करणे.
- हरभरा पिकांतील मर व कोरडी मुळकुज रोगास प्रतिकारक दाते वाणांची निर्मिती करणे.
- कडधान्य पिकांकरीता सुधारीत लागवड पद्धती विकसीत करणे.
- कडधान्य पिकाकरीता किड व रोग व्यवस्थापनाच्या शिफारसी करणे.
- कापूस पिकातील विविध वाणांचे चाचणी व बहुस्थलिय प्रयोग घेणे.
- गहू व ज्वार पिकातील विविध वाणांचे चाचणी व बहुस्थलिय प्रयोग घेणे.
- तेलबिया पिकातील विविध वाणांचे चाचणी व बहुस्थलिय प्रयोग घेणे.
- राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्पातंर्गत आवंठीत केलेले प्रयोग राबविणे व त्या संबंधीचे संशोधन कार्य करणे.

उद्देशामध्ये नंतर झालेले बदल

कृषि संशोधन केंद्र, बदनापूर अंतर्गत अखिल भारतीय समन्वयीक संशोधन प्रकल्प, मुलार्प (मुग व उडीद) ऐच्छिक संशोधन केंद्र हे सन २०१५ पासुन मुग व उडीद करीता उप केंद्र म्हणून कार्यान्वयीत झाले. या अनुषंगाने सदर केंद्राच्या संशोधनासाठी आवश्यक मनुष्यबळ आणि साधन सुविधांची पुर्तता करणे.

- बदलत्या हवामानानुसार तुर लागवड, किड व रोग व्यवस्थापणा करीता आवश्यक शिफारसी करणे.
- तुर पिकाच्या अधिक उत्पादनासाठी संकरीत वाणांची निर्मिती करणे.
- तुर पिकाचा कालावधी कमी करुन अवर्षन प्रवन क्षेत्रासाठी वाणांची निर्मिती करणे.
- एकाच वेळी परीपक्व होणारे आणि यांत्रिकीकरणासाठी सुलभ असलेल्या वाणांची निर्मिती करणे.

६. कार्यरत असलेले संशोधन प्रकल्पः राज्य योजना

- दाळवर्गीय संशोधन योजना, गहू व ज्वार योजना, कापुस सुधार योजना, तेलबिया सुधार योजना, राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प टप्पा -१
- ॲडहॉक प्रकल्प
    - ❖ संकरीत तुर प्रकल्प (सीआरपी- प्रोजेक्ट)
    - ❖ तुर पिकातील कृषि जैव विविधता संवर्धीत करणे (संगठीत संसाधन प्रकल्प)
    - ❖ तुर पिकातील अनुवंशीक पाया विस्तार करणे.
    - ❖ जंगली जातीचे संवर्धन करणे आणि यांचा वापर वाण निर्मितीसाठी करणे.
    - ❖ चवळी पिकातील कृषि जैव विविधता संवर्धीत करणे. (एनबीपीजीआर)

७. केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम उदाः बिजोत्पादन कार्यक्रम

- तूर, मुग, उडीद आणि हरभरा पिकाचे मुलभूत व पैदासकार बिजोत्पादन

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या/केंद्राचा सहभाग असणा-या महत्वाच्या शिफारसी/ उपलब्धी : ०६

९. शेतक-यांच्या सध्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत यासंबंधी सुचनाः

- तुरीची संकरीत वाण निर्मितीः तुरीचा कालावधी कमी करुन रोग प्रतिकारक वाणांची निर्मिती करणे.
- हवामान बदल लक्षात घेता मुग व उडीद पिका बरोबरच इतर कडधान्यांसाठी पेरणी वेळ, आंतर, अंतर पिक आणि पिक पद्धती संबंधी संशोधन करणे व तद्अनुषंगाने शिफारसी करणे.
- नजीकच्या काळातील पर्जन्यमानातील अनियमीतता (पावसाचा खंड, लांबलेला पाऊस, अती वृष्टी) अशा परिस्थीतीमध्ये प्रतिकारक आणि अधिक उत्पादन देणारे वाण निर्मिती.
- वातावरणातील बदलांमुळे आपल्या भागामध्ये कमी प्रमाणात दिसुन येणारा तुरीवरील फायटोफथोरा रोगाचा प्रभाव व व्यापकता वाढत चालली आहे त्याअनुषंगाने फायटोफथोरा रोगाचे व्यवस्थापन व चाचणी प्रयोग घेणे.
- कडधान्याकरीता काटेकोर पद्धतीने नियोजन, यांत्रीकीकरणासाठी मशागतीच्या शिफारसी करणे.
- विशेषतः खरीप कडधान्याकरीता तण नियंत्रणाच्या शिफारसी करणे.

- मुग पिकातील प्रकाश व औष्णीक संवदेणशील व स्वस्थाने उगवणशक्तीस प्रतिकारक वाण निर्मिती करणे.
- विविध दाळवर्गीय पिकासाठी हवामान अधारीत किड नियंत्रणासाठी आराखडा तयार करणे.
- साठवणूकीतील किडींचा अभ्यास.
- तुर, मुग व उडीद पिकातील जंगली जाती व पादप अनुवंशीक संसाधनचे जतन, उपयोग करुन पैदासकार सुधारणा कार्यक्रम बळकटीकरण करणे.
- या प्रभागामध्ये महत्त्वपुर्ण असलेल्या कापूस, गहु आणि ज्वार या पिकातील आवंठीत केलेले चाचणी प्रयोग व बहुस्थलिय प्रयोग राबविणे.
- राष्ट्रीय संशोधन प्रकल्पातंर्गत मराठवाड्यातील विविध पिकांचे बहुस्थलीय चाचणी प्रयोग घेणे.
- तेल बिया संशोधन प्रकल्पातंर्गत मराठवाड्यातील विविध पिकांचे बहुस्थलीय चाचणी प्रयोग घेणे.

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि अर्थिक सहाय्य, कोणता कालबाह्य झालेला नॉन-प्लान (अनिवार्य) प्रकल्प बंद करुन उपलब्ध कराता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा.

- वरील नमुद योजनांचे उपरोक्त उदीष्ठांप्रमाणे संशोधनाचे कार्य सुरु आहे. विशेष करुन कडधान्य पिकाच्या संशोधनात कृषि संशोधन केंद्राचे राष्ट्रीय तथा अंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम योगदान आहे. या अनुषंगाने वर नमुद केलेल्या उद्दीष्ठांची पुर्तता करण्यासाठी उपरोक्त योजनांमधील रिक्त पदांची भरती करणे अत्यंत आवश्यक आहे अथवा तदर्थ स्वरुपात कंत्राटी तत्वावर संशोधन सहाय्यकांची नेमणूक करणे व त्याकरीता आवश्यक असणारे आर्थिक सहाय्याची आवश्यकता आहे.
- कृषि संशोधन केंद्राची स्थापना सन १९५१ साली झालेली आहे तेव्हा सदरील संशोधन केंद्राची इमारत, परिसरातील रस्ते, प्रयोगशाळा व इतर आवश्यक सुविधा नव्याने निर्मिण करणे अत्यंत गरजेचे आहे.

## ४. फळ संशोधन केंद्र, हिमायत बाग, औरंगाबाद

१. संशोधन केंद्राचे नाव व पत्ताः फळ संशोधन केंद्र, हिमायतबाग, औरंगाबाद

२. स्थापना वर्षः १९३७

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधाः १०९.९३ हे.
कार्यालयीन इमारत, गोडाऊन, वैज्ञानिक भवन, विहीरी-०३ व इ.

४. मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजुर, सद्या भरलेली व रिक्त पदे) :

| योजनेचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| बळकटीकरण फळ संशोधन केंद्र | ५१ | ०९ | ४२ |
| कोरडवाहु फळ संशोधन केंद्र | ०१ | ०१ | ०० |
| अधिसंख्य योजना, फळ संशोधन केंद्र | ०३ | ०१ | ०१ |
| आस्थापना योजना, फळ संशोधन केंद्र | ९८ | २७ | ७१ |
| **एकुण** | **१५३** | **३८** | **११४** |

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदलः

मुळ उद्देश :

१. फळ पिकांवरील संशोधन करुन शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी संशोधन आधारीत मार्गदर्शन करणे.

२. उन्नत फळ पिकाची रोपवाटीका तयार करुन शेतकऱ्यास रोपे / कलमे पुरवठा करणे.

झालेले बदल :

१. फुल शेतीची लागवड करुन मराठवाडा क्षेत्रात फुलशेतीस चालना देणे.

२. लिंबु वर्गीय फळ पिकांचे रोग विरहित कलमे तयार करुन शेतकऱ्यास पुरविणे.

३. केशर आंबा पिकावर संशोधन करुन त्यांची कलमे निर्मिती करणे व शेतकऱ्यास पुरविणे तसेच केशर पिकाबाबत शेतकऱ्यास तंत्रज्ञान अवगत करणे.

६. पुर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्पः

१. उच्च तंत्रज्ञान पुष्प उत्पादन प्रकल्प.

२. लिंबुवर्गीय फळपिक अभियान प्रकल्प.

३. केशर आंबा गुणवत्ता प्रकल्प.

७. केंद्रावर चालु असलेले इतर उपक्रम उदा. बिजोत्पादन, रोपवाटीका इ.:

१. रोपवाटीका

२. संशोधनाचे प्रयोग

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या/केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारसी /उपलब्धीः चिंच जात : शिवाई

९. शेतकऱ्यांच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत ? यासंबंधी सुचनाः

१. केशर आंबा पिकाची विम्ल प्रतिबंधीत खुंटावर कलमे तयार करुन शेतकऱ्यास पुरवठा करणे.

२. फळ पिकांचे सध्या असलेल्या झाडांचे झुडपांमध्ये रुपांतरण करण्यासंबंधीचे संशोधन करणे.

३. मा. पंतप्रधान यांचे Doubling of Income या धोरणावर आधारीत संशोधन हाती घेणे.

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा.

यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाहय झालेला नॉन-प्लॅन (अनिवार्य) प्रकल्पबंद करुन उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा. : मुद्दा क्रमांक ०९ वर आधारीत संक्षिप्त संशोधन प्रकल्प यथावकाश सादर करण्यात येतील. सध्या सुरु असलेले Non Plan मधील कर्मचारी वर्ग संशोधन केंद्रावर मंजुर होणाऱ्याप्रकल्पावर अतिरिक्त कार्य करीत असतो. सध्या Non Plan मध्येच उपलब्ध कर्मचारी वर्ग व केंद्रावरील कार्य याचा ताळमेळ बसत नाही. तसेच Non Plan केंद्र अतिशे जुने स्थापित असुन ते बंद करणे शक्य नाही. कारण तसे केल्यास शेतकऱ्यांना उद्यानविद्या विषयक कलमे / रोपे पुरवठा, तंत्रज्ञान मार्गदर्शन व प्रात्याक्षिके दाखवता येणार नाहीत पर्यायाने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल.

## ५. गळीत धान्ये संशोधन केंद्र, नांदेड रोड, लातूर

१) संशोधन केंद्राचे नांव व पत्ता : गळीत धान्ये संशोधन केंद्र, लातूर

२) स्थापना वर्ष : १९५६

३) संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा :

अ) एकूण क्षेत्र : २६.२९ हेक्टर

ब) इतर सुविधा : विहीर – ०१, कुपनलिका -०२

क) राष्ट्रीय सतरावरील सुर्यफूल पिकाच्या केवडा रोग प्रतिबंधक वाणांचा चाचणी प्लॉट

४) मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजूर, सद्या भरलेल व रिक्त पदे) :

| **योजनेचे नांव** | **मंजूर पदे** | **भरलेली पदे** | **रिक्त पदे** |
|---|---|---|---|
| पस-या भूईमुगांवरील संशोधन योजना | ०९ | ०३ | ०६ |
| भूईमुग बळकटीकरण योजना | ०६ | ०३ | ०३ |
| कायम मजुरांची नियमीत अस्थापना योजना | १५ | ०३ | १२ |
| अनुवंशीकीय तेलबिया सुधार योजना | ०३ | ०२ | ०१ |
| कायम मजुरांची अस्थापना, गळीतधान्यें संशोधन उपकेंद्र, अंबाजोगाई | १८ | ०८ | १० |
| **एकूण** | **५१** | **१९** | **३२** |

५) संशोधन केद्राचा मूळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदल :

अ) विविध जनुकीय बाणाचे प्रकार गोळा, मुल्यांकन, संवर्धन व त्याचे दस्तावेज तयार करणे.

ब) गरजेवर आधरित तसेच एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन पध्दती विकसित करणे.

क) विविध क्षेत्रासाठी बीज धारणक्षमता वाढविणे, कार्यक्षम अन्नद्रव्य (मुख्य व सूक्ष्म)व पाणी व्यवस्थापन करण्यासाठी योग्य उत्पादन तंत्रज्ञान विकसीत करणे.

ड) बिजोत्पादन तंत्रज्ञान विकसीत करणे. प्रमाणीत बीजोत्पादन मध्ये योग्य उत्पादन तंत्रज्ञान विकसीत करून प्रमाणबध्द करणे.

इ) शेतकऱ्यांच्या शेतावर संशोधन प्रयोग राबविणे.

६) पूर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प :

अ) पूर्ण झालेले संशोधन प्रकल्प : निरंक

ब) कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प : निरंक

७) केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम : विविध पिकांचे बिजोउत्पादन

८) गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या / केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारशी / उपलब्धीः

अ) कृषि विद्या विभाग शिफारशी – ०१

ब) किटकशास्त्र विभाग शिफारशी – ०२

९) शेतकऱ्यांच्या सध्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत. या संबंधी सूचना :

अ) अधिक उत्पादन क्षमता असलेले, बदलत्या हवामानास, पाण्याच्या ताणास तसेच प्रमुख कीड व रोगांस सहनशिल व परिपक्वता कालावधी कमी असणारे असे वाण निर्माण करणे.

ब) विविध गळीत धान्य पिकांखालील प्रथम रेषिय प्रात्यक्षिके मोठ्या प्रमाणावर विभागीय स्तरावर राबविणे व शेतकऱ्यांना उत्तेजन देणे.

१०) संक्षिप्त संशोधन प्रकल्प :

अ) अखिल भारतीय समन्वीत प्रकल्प या योजनेंतर्गत भूईमुग या पिकांवर हे संशोधन केंद्र ऐच्छिक केंद्र म्हणून कार्यरत असून ते राष्ट्रीय स्तरावरील अखिल भारतीय भूईमुग समन्वीत प्रकल्प या योजने अंतर्गत नियमीत करावे.

ब) हे संशोधन केंद्र तिळ या तत्सम गळीत धान्य पिकांवर अतिरिक्त संशोधन करीत असून या वर्षी या केंद्रामार्फत टी.एल.टी. – १० हा वाण राज्य स्तरांवर लागवडीसाठी प्रसारीत करण्यात आला आहे. त्यामुळे या पिकांवर राष्ट्रीय स्तरावरील अखील भारतीय समन्वीत तीळ प्रकल्प या योजने अंतर्गत या केंद्राचा समावेश करण्यात यावा व यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ (पैदासकार -०१, कृषि विद्यावेता - ०१, किटकशास्त्रज्ञ -०१, वनस्पती रोगशास्त्रज्ञ व इतर तांत्रिक कर्मचारी) आणि अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात यावे.

## ६. कोरडवाहु भात संशोधन केंद्र,लातुर रोड, तुळजापुर जि.उस्मानाबाद.

१. संशोधन केंद्राचे नाव व पत्ता :- कोरडवाहु भात संशोधन केंद्र, तुळजापुर जि.उस्मानाबाद

२. संशोधन स्थापना वर्ष.:- १९६८

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा :- एकुण क्षेत्र ११.४० हेक्टर
सुविधाः- कार्यालय इमारत, गोडाऊन, खळे, गोठा व ट्रॅक्टर

४. मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजुर सद्या भरलेली व रिक्त पदे :-

- कोरडवाहू पेरसाळ संशोधन केंद्र.तुळजापुर (एन.ए.आर.पी.)
  मंजुर पदे १२ भरलेले पदे ०१ रिक्त पदे ११
- राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, तुळजापुर (आर.पी.आर.एस.)
  मंजुर पदे १७ भरलेले पदे ०४ रिक्त पदे १३

५. संशोधन केंद्राचा मुळ उदेश व त्यात नंतर झालेला बदल :-
मुळ उदेशः- साळ पिकावर संशोधन करुन नविन जाती विकसीत करणे
बदल :-साळ व इतर पिकाचे बिजोत्पादन घेणे.

६. पुर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प :-निरंक

७. केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम उदा. बिजोत्पादन, रोपवाटिका इ.:- बिजोत्पादन

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या/केंद्राचा सहभाग असणा-या महत्वाचा शिफारसी/उपलब्धीः-
निरंक

९. शेतक-यांच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत. या संर्बेधी सुचना.
१. शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळा
२. बियाणे विक्री परवानगी.

१०.संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्यक कोणता कालबाहय झालेला नॉन-प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करुन उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा.
१. संशोधनासाठी लागणरी रिक्त पदे भरणे.
२. प्रक्षेत्रावर सिचंनाची व्यवस्था करणे.

## ७. सिताफळ संशोधन केंद्र, अंबाजोगाई

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संशोधन केंद्राचे नाव व पत्ता | : | सिताफळ संशोधन केंद्र, अंबाजोगाई |
| २. | स्थापना वर्ष | : | १९९७ |
| ३. | संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा | : | क्षेत्र १९.५ हे. कार्यालयीन इमारत मल्टी परपज ब्लॉक शेडनेट हाऊस, विहीर व कुपनलिका |
| ४. | मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजूर | : | |

| योजनेचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| सिताफळ संशोधन केंद्र, अंबाजोगाई | १७ | १२ | ०५ |

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदल :

१. सिताफळाच्या विविध जातीचा संग्रह करणे, अभ्यासणे आणि जतन करणे.
२. सिताफळ फळपिकाचे लागवडीचे आणि उत्पादनाचे आधुनिक तंत्र विकसीत करणे.
३. अवर्षणात आणि तापमानात टिकाव धरणाऱ्या वाणांचा शोध घेणे.
४. सिताफळातील योग्य रुट स्टॉकचा शोध घेणे.
५. सिताफळाबरोबर इतर सिताफळवर्गीय पिकांचा जास्त उत्पादनासाठी अभ्यास करणे.
६. सिताफळवर्गीय फळपिकामध्ये सीताफळाच्या दर्जात्मक विकासात आणि उत्पादनात सुधारणा करणे.
७. प्रमाणित खतांची मात्रा व सुक्ष्म अन्नद्रव्याची उपयोगीता जाणुन घेणे.
८. सीताफळाच्या फळावर प्रक्रिया करून त्यांची गुणवत्ता व टिकावुपणा वाढविणे.
९. विविध रोग व किडीचे व्यवस्थापन व नियंत्रण करणे.
१०. रोगमुक्त रोपांची पैदास करणे.

६. पूर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प :
कार्यरत :-

१. सिताफळ घन लागवत पद्धत २. सिताफळ प्रक्रिया उद्योग ३. सिताफळ छाटणी प्रयोग
४. सिताफळाची सेल्फ लाईफ (Self Life) वाढवणे ५. सिताफळाचे खत व्यवस्थापन.
६. जर्मप्लाझम सर्व्हे, कलेक्शन व इव्हेलेशन ७. व्हरायटल ट्रयाल.

७. केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम उदा. बिजोत्पादन, रोपवाटिका इ. सिताफळ कलम रोपेः- धारुर-६, टीपी -७, अर्कासहान, रामफळ व हनुमानफळ या कलम रोपांची निर्मिती व शेतकऱ्यांना वितरण.

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या/केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारसी/उपलब्धी : ०१

९. शेतकऱ्यांच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत? या संबंधी सूचना :- अ. सिताफळा मध्ये handpollination करुन बियांचे प्रमाण कमी करुन गराचे प्रमाण वाढविणे ब. सिताफळ काढणी पश्च्यात तंत्रज्ञानाच्या सहाय्याने गरावर प्रक्रिया करुन वेगवेगळे उप पदार्थ बनविणे.

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाह्य झालेला नॉन-प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करुन उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा : संक्षिप्त प्रकल्प :- महाराष्ट्रात बीड, जळगांव, औरंगाबाद, परभणी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, सातारा व भंडारा या जिल्ह्यात सीताफळाची झाडे मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. मराठवाड्यात दौलताबाद, धारुर व बालाघाट ही गावे सिताफळासाठी प्रसिद्ध आहेत. विदर्भात पवनी, भंडारा, गोंदिया, वाशीम, माहूर

तर सातारा, खंडाळा, फलटण इत्यादी गावे पश्चिम महाराष्ट्रात नावारुपाला येत आहेत. महाराष्ट्रात १९९० पर्यंत कोरडवाहू फळझाडाखाली ४२१०० हेक्टर क्षेत्र असतांना त्यापैकी एकट्या सीताफळाखाली ७८०० हेक्टर क्षेत्र यशस्वी लागवडीची ग्वाही देणारे ठरले आहे. सन १९९० पासून रोजगार हमी योजनेमध्ये कोरडवाहू फळझाडांच्या लागवडीत सिताफळ देखील अनुदान पद्धतीत घेतलेले आहे. त्यामुळे सिताफळ लागवड ही शेतकरी बांधवांना चालून आलेली एक संधी वाटते आणि त्यातून सिताफळलागवड मोठ्या प्रमाणात होत आहे. सध्या महाराष्ट्र राज्यात या पिकाखालील लागवडीचे क्षेत्र ६० हजार हेक्टर पर्यंत झाले आहे.

सिताफळ संशोधन केंद्राच्या १२.०० एकर प्रक्षेत्रावर सीताफळामधील विविध वाणांचा संग्रह आहे. संशोधन केंद्राने संशोधनाअंती धारुर-६ (२०१४) हा वाण निवड पद्धतीने विकसित करुन प्रसारीत केला आहे. कलम रोपांची विक्री केवळ मराठवाड्यापुरती मर्यादित न राहता ती पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व तामिळनाडू, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये करण्यात आली. सिताफळहे फळ पीक लवकर पिकत असल्याकारणाने त्यावर फळ प्रक्रिया करणे व काढणी पश्चात तंत्रज्ञान विकसीत करणे अगत्याचे आहे.

लागवडीचे क्षेत्र वाढत असताना शाश्वत रोग मुक्त रोपांची निर्मिती करुन शेतकऱ्यांना पुरविणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यातील बालाघाटाच्या डोंगररांगातील परिसर या पिकाच्या उत्पादन वाढीसाठी जमीन व हवामान दृष्ट्या अनुकुल आहे. त्या अनुषंगाने सिताफळ संशोधन केंद्र, अंबाजोगाई येथील संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रवर विविध जातीची लागवड केली आहे. महाराष्ट्रात जवळपास सीताफळाची सर्व फळ ही खाण्यासाठीच वापरली जातात व प्रक्रियासाठी फारच कमी फळे वापरली जातात. उत्पादनाच्या मानाने उपलब्ध असलेले प्रक्रिया उद्योग नगण्य असल्यामुळे शेतकऱ्यांना सिताफळ मिळेल त्या भावाने विकावे लागते. सीताफळापासून विविध प्रकारचे प्रक्रिया युक्त खाद्यपदार्थ तयार केली जातात जसे की सिताफळ रबडी, स्क्वॅस, सिताफळ गर (ज्यास आईसक्रीम उद्योग जगतातून मोठी मागणी आहे) तसेच सीताफळातील प्रत्येक भागाचा उपयोग होत असल्यामुळे अशा प्रकारचे खाद्य पदार्थ व इतर टिकावू पदार्थ तयार करण्यासाठीचे तंत्रज्ञान विकसीत व प्रमाणित करणे गरजेचे आहे. सीताफळाची गुणवत्ता टिकविण्यासाठी व फळे दर्जेदार राहण्यासाठी काढणीपश्चात व्यवस्थापन व प्रक्रिया तंत्रज्ञान अधिक विकसीत करणे गरजेचे आहे.

## ८. मोसंबी संशोधन केंद्र बदनापूर

१. संशोधन केंद्राचे नाव व पत्ता - मोसंबी संशोधन केंद्र बदनापूर

२. स्थापना वर्ष - २००६

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा - १८.४०हे

४. मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजूर, सद्या भरलेली व रिक्त पदे)

सहा मृदाशास्त्रज्ञ(१), सहा विकृतीशास्त्रज्ञ(१), कृषी सहायक (४), कनिष्ठ लिपिक - १

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदल –

- विस्तार,संशोधन

६. पूर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प -

७. केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम उदा. बिजोत्पादन, रोपवाटिका इ.-

- बिजोत्पादन क्षेत्र:५ हे(तूर,मुग)

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या / केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारसी ०१

९. शेतकऱ्यांच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत ? यासंबंधी सूचना – निरंक

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाहय झालेला नॉन-प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करुन उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा. - निरंक

## ९. केळी संशोधन केंद्र, नांदेड देगलूर रोड बाफना टी. पांईट, नांदेड

१. संशोधन केंद्राचे नावः केळी संशोधन केंद्र, नांदेड

२. स्थापना वर्षः-जुन २००६

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविध :- क्षेत्र -१७.३६ हे. सुविधा-१) कार्यालयीन इमारत

४. मनुष्यबळ(प्रकल्प निहाय मंजूर, सद्या भरलेली व रिक्त पदे) अधिकारी/ कर्मचारी पदे

| **योजनेचे नाव** | **मंजूर पदे** | **भरलेली पदे** | **रिक्त पदे** |
|---|---|---|---|
| केळी संशोधन केंद्र, नांदेड | **०९** | **०४** | **०५** |

५. संशोधन केंद्राचा मुळ उदेश त्यात नंतर झालेले बदल.

उद्देश :- १) केळी पिकात सुधारणा करणे

२) केळी पिक लागवड तंत्रज्ञान व व्यवस्थापन

३) केळी पिकाचे संरक्षण

४) केळी पिकाची उपयुक्ता

६. पूर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प

कार्यरत असलेले प्रयोग - ०५

७. केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम उदा. बिजोत्पादन, रोपवाटीका इ.:-

बिजोत्पादन : खरिप - सोयाबीन

: रब्बी - करडई

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या/ केंद्राचा सहभाग असणा-या महत्वाच्या शिफारसी /उपलब्धी
शिफारसी : ०२

९. शेतक-यांच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षत घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत : केळी पिकावरी करपा रोग कुकुंबर मोझॅक व्हायरस

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा : निरंक

# उप-संशोधन केंद्रे

## १. कापूस संशोधन केंद्र, महेबूब बाग फार्म, वनामकृवि, परभणी

१. संशोधन केंद्राचे नाव, पत्ता : कापूस संशोधन केंद्र, महेबूब बाग फार्म, वनामकृवि, परभणी

२. संशोधन केंद्राचे स्थापना वर्ष : १९१८

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा : एकूण क्षेत्र -११.३८ हेक्टर, कार्यालय (एक नवी व एक जूनी इमारत), एक गोडाऊन. ट्रॅक्टर व अवजारे.

४. मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजुर, सध्या भरलेली व रिक्त पदे) :

| पद | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| कापूस संशोधन केंद्र, महेबूब बाग फार्म, परभणी | **२१** | **९** | **१२** |

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदल : देशी कापूस वाणाचे अधिक उत्पादन देणारे व धाग्याची चांगली गुणवत्ता असलेले वाण विकसीत करणे.

६. पुर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प : सध्यस्थितीत लांब धाग्याचे व अधिक उत्पादन देणारे देणारे ११ देशी कापूस वाणांची निर्मिती या संशोधन केंद्राने केलेली आहे.

७. केंद्रावर चालु असलेले इतर उपक्रम उदा. बिजोत्पादन, रोपावाटीका ई. : देशी कापूस बिजोत्पादन तसेच सोयाबीन व तूर पिकांचे पैदासकार बिजोत्पादन या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावर घेण्यात येते.

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या / केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारशी / उपलब्धी : पीए-७४० (२०१९), पीए-८१०(२०२१), पीए-८१२ (२०२०) व पीए-८३७ (२०२२) हे चार वाण प्रसारीत करण्यात आले.

९. शेतकऱ्यांच्या सध्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत : संशोधन केंद्रास मनुष्यबळ तसेच आर्थिक निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाहय झालेला नॉन-प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करुन उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा : देशी कापूस वाणांचा शेतकऱ्याच्या शेतावर प्रसार करण्यात यावे. या बिजोत्पदनाव्दारे तयार झालेले बियाणे शेतकऱ्यांच्या शेतावर पिक प्रात्याक्षिक व्दारे प्रसार करण्यात यावे. यासाठी योग्य त्या निधीतून आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

## २. बाजरी संशोधन केंद्र वैजापूर स्टेशन रोड वैजापूर जि.औरंगाबाद

१) संशोधन केंद्राचे नांव - बाजरी संशोधन केंद्र वैजापूर स्टेशन रोड वैजापूर जि.औरंगाबाद.

२) स्थापना वर्ष - १९७३

३) संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा

एकुण क्षेत्र - २०.८९ हेक्टर, विहीर - २, कुपनलिका – ०१, कार्यालय – ०१, बहुउद्देशीय इमारती - ०२, भांडार गृह – ०१, गोठा – ०१, निवासस्थाने - ०६

४) मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजुर, सद्या भरलेली व रिक्त पदे)

| योजनेचे नांव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| बाजरी संशोधन केंद्र योजना वैजापूर | **१६** | **०८** | **०८** |

५) संशोधन केंद्राचा मुळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदल

- वैजापूर तालुका व त्या लगतचा आसपासचा प्रदेश हा मुळातच खुपच कमी पाऊसाचा प्रदेश असल्या कारणाने या भागात बाजरी हे कमी पाण्यावर येणारे तृणधान्य वर्गीय पिक घेतल्या जात असे, त्या अनुषंगाने वैजापूर येथे बाजरी संशोधन केंद्र स्थापन करून शेतकऱ्यांना नवनविन संकरीत व सुधारीत बाजरी वाण पुरवून उत्पादन वाढविणे हा उद्देश होता. काळानुरूप त्यामध्ये अमुलाग्र बदल होऊन बाजरी उत्पादनात भरघोस वाढ होऊन शेतकऱ्यांचया शेतावर नवीन संकरीत व सुधारीत वाण पोहोचवुन संशोधन केंद्रावर गोठा प्रमाणात बीजोत्पादन घेण्यात येऊन शेतकऱ्यांना प्रात्याक्षिक रुपात बियाणे देण्यत येते.
- संशोधन केंद्रावर SMLT बाजरीचे प्रयोग घेण्यात येऊन वेळोवेळी निरीक्षणे घेण्यात येतात व नवनवीन बाजरीचा वाण विकसीत होतात.

६) पुर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प -

व.ना.म.कृ.वि. परभणी अंतर्गत १९७३ पासुन बाजरी संशोधन केंद्र वैजापूर स्थापन झालेले असुन आजतागायत कार्यरत आहे. बाजरी संशोधन केंद्र योजना या अंतर्गत नॉन - लॅन प्रकल्प असुन प्रक्षेत्रावर बाजरीचे प्रयोग, खरीप व रब्बी हंगामात संकरीत बाजरी बीजोत्पादन तसेच खरीप व रब्बी हंगामात सोयाबीन, तुर हरभरा व ज्वारी इ.पिकांचे बीजोत्पादन मोठ्या प्रमाणात घेतल्या जाते.

७) केंद्रावर चालु असलेले इतर उपक्रम उदा.बिजोत्पादन, रोपवाटिका इत्यादी

बाजरी संशोधन केंद्रावर खरीप हंगामामध्ये बाजरीचे A×B चे बिजोत्पादन घेण्यता येते तसेच सोयाबीन, तुर मुग इ. पिकांचे ही बीजोत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतल्या जाते तसेच रब्बी हंगामामध्ये संकरीत बाजरीचे (A×R) बीजोत्पादन मोठ्या प्रमाणात घेतल्या जाते. प्रक्षेत्रावर मनुष्यबळ उपलब्ध झाल्यास प्रक्षेत्रावर फळपिके व भाजीपाला पिके यांची रोपवाटीका करण्याचा माणस आहे.

८) गेल्या पाच वर्षात केंद्रावरून केलेल्या / केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारसी / उपलब्धी

विद्यापीठाने बाजरी पिकाचे नवनवीन संकरीत व सुधारीत वाण संशोधीत केलेले असुन त्यामध्ये एच बी -१२००, एएसबी-१२६९ हे संकरीत वाण तसेच ABPC-४-३ या सुधारीत वाणाचा समावेश आहे. सदरील वाण विकसीत होत असतांना बाजरी संशोधन केंद्र वैजापूर या प्रक्षेत्रावर बाजरीचे प्रयोग घेणे तसेच या संशोधीत वाणांचे बीजोत्पादन मोठ्या प्रमाणात घेऊन संशोधन केंद्राचा सहभाग आहे. एक प्रकारे या बाजरी संशोधन कार्यात मोठ्या प्रमाणात सहभाग असल्यामुळे या संशोधन केंद्रासाठी ही फार मोठी उपलब्धी आहे. गेल्या पाच वर्षात संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावर बाजरी, सोयाबीन, तुर, ज्वारी इ. पिकांचे मोठ्या प्रमाणात बीजोत्पादन घेण्यात येत आहे.

९) शेतकऱ्याच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरू असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत ? या संबंधी सुचना

सध्या २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृण धान्य वर्ष म्हणुन साजरे होत असल्या कारणाने तसेच तृणधान्याचे आहारातील महत्व लक्षात घेता बाजरी पिकास अनन्य साधारण महत्व आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या शेतावर बाजरी पिकाचे क्षेत्र कसे वाढेल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी नवनवीन संकरीत व सुधारीत असे बाजरीचे वाण संशोधन करून विकसीत करून शेतकऱ्यांना पुरविणे आत्यावश्यक आहे. आहारामध्ये तृण धान्याचे महत्व लक्षात घेता सध्यस्थितीत व भविष्यात बाजरीचे क्षेत्र निश्चित वाढविण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. त्यासाठी संशोधन केंद्रावर बाजरीचे संशोधन कसे वृध्दीगंत होईल तसेच नवीन तंत्रज्ञान कसे वापरता येईल यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. बाजरी संशोधन केंद्रावर बाजरी पिकासंबंधी तसेच आसपासचा कमी पाऊसाचा प्रदेश लक्षात घेता प्रक्षेत्रावर नवीन संशोधन प्रकल्प अस्तित्वात आणणे गरजेचे आहे. जेणेकरून या संशोधन केंद्राच्या परिसरातील व लगतच्या प्रदेशातील शेतकऱ्यांना भविष्याच्या दृष्टीकोनातुन फायदा होईल.

१०) संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करणे यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य तसेच कोणता कालबाह्य झालेला नॉन - प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करून उपलब्ध करता येईल याविषयी सविस्तर माहिती

विद्यापीठ स्थापनेनंतर १९७३ साली बाजरी संशोधन केंद्र वैजापूर या केंद्राची स्थापना करण्यात आली. संशोधन केंद्र स्थापना झाल्यानंतर या ठिकाणी AICRP-ON PEARL MILLET अंतर्गत बाजरी संशोधन प्रकल्प होता. त्यामध्ये प्लॅट लीडर, सहाय्यक पैदासकार , कृषि अधिकारी, कृषि सहाय्यक आणि मजुर असा मोठ्या प्रमाणात अधिकारी व कर्मचारी वर्ग होता. त्यामुळे प्रक्षेत्रावर बाजरी पिकाचे संशोधन मोठ्या प्रमाणावर होऊन संशोधन केंद्राच्या माध्यमातून लगतचा प्रदेशावरील शेतकऱ्यांना तसेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होत असे. परंतु सदरील बाजरी संशोधन केंद्र हे अवर्षन प्रवर्षन भागात असल्यामुळे नेहमी पाऊस कमी होत असल्यामुळे संशोधन कार्यात पाण्याअभावी नेहमी अडथळे येत असे त्या अनुषंगाने सदरील बाजरी संशोधनाचे कार्य हे वैजापूर ऐवजी राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प औरंगाबाद येथील प्रक्षेत्रावर सुरू करण्यता आले. सध्या बाजरी संशोधन केंद्र वैजापूर या नॉन - प्लॅन योजनेअंतर्गत फक्त कृषि सहाय्यक, शिपाई, पहारेकरी आणि मजुर इ.कर्मचारी असुन त्या माध्यमातुन प्रक्षेत्रावर बाजरी चे च्ख्र्र सारखे वेगवेगळे प्रयोग जसे खरीप व रब्बी हंगामात बाजरी, सोयाबीन, तूर, ज्वारी व हरभरा इ.पिकांचे बीजोत्पादन मोठ्या प्रमाणात घेण्यात येत असुन महसुल मिळत आहे.

परंतु सध्या निसर्ग चक्र बदलल्यामुळे मागील आठ दहा वर्षापासुन पाऊस चांगला होऊन पाण्याची उपलब्धता वाढल्यामुळे संशोधन कार्य चांगल्या प्रकारे होत आहे. तसेच प्रक्षेत्राशेजारी मध्यम प्रकल्प झालेला असुन त्या माध्यमातुनही विहीरींना पाण्याची उपलब्धता होत आहे. त्या अनुषंगाने बाजरी संशोधन केंद्र वैजापूर येथे राज्यशासनाचे AICRP-ON MINOR MILLET/MINOR PULSES सारखे संशोधन प्रकल्प आणल्या जाऊन त्या मधुन प्लँट ब्रीडर, सहाय्यक पैदासकार, कृषी अधिकारी, कृषि सहाय्यक आणि मजुर इत्यादी पदे निर्माण करून संशोधन प्रकल्प अस्तित्वात आल्यास मोठ्या प्रमाणात बाजरी पिकाचे संशोधन कार्य होऊन परिसरातील व मराठवाडा भागातील शेतकऱ्यांना भविष्याच्या दृष्टिकोनातुन फायदा होईल यासाठी शासन स्तरावरून आर्थिक सहाय्य उपलब्ध होऊ शकते. प्रक्षेत्र बळकटी करणाअंतर्गत प्रक्षेत्रावर करण्यात आलेल्या उपलब्ध सुविधांना या संशोधन प्रकल्पासाठी उपयोग होईल. सद्यस्थितीत प्रक्षेत्रावर विहीर, पाईपलाईन, बहुउद्देशीय इमारती, निवासस्थाने, गोठा - थ्रेशिंग यार्ड, भांडारगृह, कार्यालय तसेच प्रक्षेत्राच्या काही बाजुने असलेली संरक्षित भिंत हे सर्व उपलब्ध असल्या कारणाने संशोधन प्रकल्प राबविता येईल.

## ३. कृषि संशोधन केंद्र, सोमनाथपूर, उदगीर

१. संशोधन केंद्राचे नाव : कृषि संशोधन केंद्र, सोमनाथपूर (उदगीर)

२. स्थापना वर्ष : १९६३

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा : २२.१० हेक्टर (पेरणीयोग्य क्षेत्र) कार्यालय इमारत, बहुउद्देशीय गोदाम, गोठा, खळे इ.

४. मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजुर, सध्या भरलेली व रिक्त पदे) :

| योजनेचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| कृषि संशोधन केंद्र, सोमनाथपूर (उदगीर) | २५ | ०७ | १८ |

५. संशोधन केंद्राचा मूळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदल : गावराण कापूस सुधार योजनेअंतर्गत या संशोधन केंद्रात गावराण व संकरित कापसाचे प्रयोग निरीक्षणे घेणे व त्याचा अहवाल संबंधित कार्यालयास सादर करणे त्यामुळे या संशोधन केंद्राचे पूर्वीचे नाव कापूस संशोधन केंद्र असे होते. फक्त कापूस पिकावर संशोधन केंद्रीत होते परंतु कालांतराने इतर सर्व पिकांचे प्रयोग व निरीक्षणे घेणे व अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे हे काम चालू झाले व या संशोधन केंद्राचे नाव कृषि संशोधन केंद्र असा नावबदल करण्यात आला.

६. पूर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प :बिजोत्पादन व विविध पिकांच्या प्रयोग चाचणी

७. केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम :बिजोत्पादन व विविध पिकांच्या प्रयोग चाचणी

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरून केलेल्या / केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारसी / उपलब्धीः कृषि संशोधन केंद्र, सोमनाथपूर या संशोधन केंद्रात खरीप हंगामामध्ये खरीप ज्वारी, सोयाबीन, साळी, कापूस व रब्बी हंगामामध्ये रब्बी ज्वारी, करडई इ. पिकांचे चाचणी प्रयोग घेतले जातात व शिफारस करून वाण पूर्णत्वास येते. परभणी शक्ती, परभणी मोती, सोयाबीनच्या नवीन वाणाच्या जातीचे प्रयोग येथे घेतलेले आहेत.

९. शेतकऱ्यांच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरू असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत यासंबंधी सूचना : कृषि हवामान विभागाच्या हवामानात होणारे बदल, त्यांचे पिकांवर होणारे परिणाम यांचा अभ्यास करून पीक नुकसानीची जोखीम कमी करण्याविषयी तंत्रज्ञान व पिक पध्दती विकसित करणे, रासायनिक खते आणि किडनाशकांचा वापर कमी करून पर्यावरणपुरक शेतीपध्दती विकसित करणे व जमिनीची सुपीकता व उत्पादकता वाढविणे. शेतमालावर सर्वांगीण प्रक्रिया करून मूल्यवर्धन करण्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री आणि पध्दती विकसित करणे. लहान शेतकऱ्यांना परवडतील आणि वापरता येतील अशी यंत्रे / अवजारे विकसित करणे. कृषि आधारित उद्योगासाठी योग्य प्रतीचा शेतमाल पिकविण्याचे तंत्रज्ञान विकसित करणे.

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाह्य झालेला नॉन प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करून उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा : विद्यापीठात व्यापारी तत्वावर सुधारित व संकरित वाणांचे बिजोत्पादन, फळ पिकांची रोपे किंवा कलमे आणि विविध कृषि निविष्ठा जसे जैविक व जिवाणू खते, जैविक किडनाशके, जैविक घटक उत्पादन करून विक्री करणे बाबत धोरण निश्चित करणे. खाजगी कंपन्या / संस्थाबरोबर करार करून त्यांच्यासाठी संशोधन प्रकल्प राबवायला विद्यापीठांना परवानगी देणे आणि त्याविषयी अटी / शर्ती निश्चित करणे.

## ४. बीज तंत्रज्ञान संशोधन व दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग, वनामकृवि, परभणी

| | | |
|---|---|---|
| १. | संशोधन केंद्राचे नाव व पत्ता | : बीज तंत्रज्ञान संशोधन व दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग, वनामकृवि, परभणी |
| २. | स्थापना वर्ष | : १. बीज तंत्रज्ञान संशोधन स्थापना वर्ष : १९७९<br>२. पैदासकार बिजोत्पादन विभाग सध्याचे दर्जेदार बिजोत्पादन विभाग स्थापना वर्ष : २००५-०६ |

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा :

बीज तंत्रज्ञान संशोधन विभागाकडे असलेले क्षेत्र : २ हे.

प्रक्षेत्रावरील सुविधा : सिंचन सुविधा, तारेचे कुंपन

बीज प्रयोगशाळा : विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणा-या विविध कृषि संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, कृषि महाविद्यालय, कृषि तंत्र विद्यालय, ई. च्या प्रक्षेत्रावर घेण्यात आलेल्या पैदासकार बीजोत्पादन कार्यक्रमातुन उत्पादीत झालेल्या बियाणांची उगवणक्षमता व तत्सम गुणात्मक बाबींची चाचणी तपासण्याकरीता बीज तपासणी प्रयोगशाळा (बीज शरीरक्रीयाशास्त्र व बीज रोगशास्त्र प्रयोगशाळा) कार्यरत आहे.

४. मनुष्यबळ (प्रकल्प निहाय मंजुर, सद्या भरलेली व रिक्त पदे)

| योजनेचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| बीज तंत्रज्ञान संशोधन | ०८ | ०५ | ०३ |
| दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग | ०७ | ०४ | ०३ |
| मध्यवर्ती बियाणे (शितगृह व बियाणे देखरेख कक्ष) | ११ | ०७ | ०४ |
| **एकुण** | **२६** | **१६** | **१०** |

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्देश

दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग

१. मुलभुत व पैदासकार बियाणांचे भारत सरकार (GOI) यांनी नोंदविलेल्या मागणी प्रमाणे दर्जेदार बियाणे बीजोत्पादन कार्यक्रम राबविणे.

२. दर्जेदार बियाणे बीजोत्पादन करण्याकरीता शेतकरी बीजोत्पादक कंपनी, शेतकरी बीजोत्पादक गट व खाजगी बीजोत्पादक कंपनी तसेच कृषि विज्ञान केंद्र, यांच्याशी सामंजस्य करार करणे/दुवा साधने.

३. विविध पिकांच्या वाणांची अनुवंशिक शुध्दता राखण्याकरीता पिकांच्या वाढीच्या विविध अवस्थेत बीजोत्पादन क्षेत्रास भेट देणे, देखरेख करणे व बियाण्याच्या अनुवंशीक शुध्दता राखणे संदर्भात मार्गदर्शन करणे.

बीज तंत्रज्ञान संशोधन विभाग

१. बीज विज्ञान व बीज तंत्रज्ञान संबंधीत राष्ट्रीय स्तरावरील विविध प्रयोगांची आखणी व अमंलबजावणीकरुन त्याबाबतच्या शिफारशी शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे.

२. बियाणे व क्षेत्र मानंकाविषयी संशोधन करुन बियाणे गुणवत्तेची मानके तयार करणे / सुधारणे करणे.

३. दर्जेदार बीजोत्पादन, बीज प्रक्रीया व बियाणे साठवण तसेच बियाण्यांची गुणवत्ता राखणे संदर्भात शेतकऱ्यांना प्रशिक्षणाद्वारे मार्गदर्शन करणे.

४. विविध पिकांच्या बियाणांवर येणाऱ्या रोगांवर संशोधन करणे व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना यावर संशोधन करणे व शिफारशी देणे.

६. पुर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प :

अ. पुर्ण झालेले संशोधन प्रकल्प : निरंक

ब. कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प :

- I. Seed Production & Certification : 07
- II. Seed Physiology, Storage, and Testing : 05
- III. Seed Pathology : 05

७. केंद्रावर चालु असलेले इतर उपक्रम उदा. बिजोत्पादन, रोपवाटीक इ.

बीज तंत्रज्ञान संशोधन विभाग

बीजोत्पादन : निरंक

रोपवाटीक : निरंक

या कार्यालयाच्या अंतर्गत ०३ दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग कार्यरत आहेत.

१. दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग, खानापुर अ वनामकृवि, परभणी

२. दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग, खानापुर ब वनामकृवि, परभणी

३. दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग, शेंद्रा अ वनामकृवि, परभणी

वरील नमुद केलेल्या बियाणे उत्पादन विभागाची माहिती खालील प्रमाणे

१. दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग, खानापुर अ वनामकृवि, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स्थापना वर्ष | : | सन २००८ |
| २. | उपलब्ध असलेले क्षेत्र | : | ६० हे. |
| ३. | उपलब्ध असलेलया सुविधा | : | शेततळे : ०२, विहिर : ०३, ठिबक सिंचन : २ हे. क्षेत्राकरीता तुषार सिंचन : ४ सेट, यात्रिकीकरण : ट्रॅक्टर : ०४, कम्बाईन्ड हार्वेस्टर : ०१, ट्रॅक्टर ट्रॉली : ०१, कार्यालय ईमारत : ०१, गोडाऊन : ०१ |
| ४. | उद्दिष्टे | : | वनामकृवि, परभणी ने प्रसारीत केलेल्या विविध पिकांच्या वाणांचे पैदासकार बियाणांचे दर्जेदार बीजोत्पादन करणे. |

२. दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग, खानापुर ब वनामकृवि, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स्थापना वर्ष | : | सन २००९ |
| २. | उपलब्ध असलेले क्षेत्र | : | १०७.३० हे. |
| ३. | उपलब्ध असलेलया सुविधा | : | विहिर : ०५, तुषार सिंचन : ३ सेट, यात्रिकीकरण : ट्रॅक्टर : ०५, कम्बाईन्ड हार्वेस्टर : ०१, ट्रॅक्टर ट्रॉली : ०२, कार्यालय ईमारत : ०१ गोडाऊन : ०१ |
| ४. | उद्दिष्टे | : | वनामकृवि, परभणी ने प्रसारीत केलेल्या विविध पिकांच्या वाणांचे पैदासकार बियाणांचे दर्जेदार बीजोत्पादन करणे. |

३. दर्जेदार बियाणे उत्पादन विभाग, शेंद्रा अ विभाग, वनामकृवि, परभणी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | स्थापना वर्ष | : | सन २००९ |
| २. | उपलब्ध असलेले क्षेत्र | : | ९५ हे. |
| ३. | उपलब्ध असलेलया सुविधा | : | शेततळे : ०१, विहिर : ०२, तुषार सिंचन : २ सेट, |

यात्रिकीकरण : ट्रॅक्टर : ०३, कम्बाईन्ड हार्वेस्टर : ०१, ट्रॅक्टर ट्रॉली : ०२, कार्यालय ईमारत : ०१, गोडाऊन : ०१

४. उद्दिष्टे : वनामकृवि, परभणी ने प्रसारीत केलेल्या विविध पिकांच्या वाणांचे पैदासकार बियाणांचे दर्जेदार बीजोत्पादन करणे.

८. गेल्या पाच वर्षांत केंद्रावरुन केलेल्या / केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारशी/उपलब्धीः ०७

९. शेतकऱ्यांच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असणाऱ्या महत्वाच्या शिफारशी / उपलब्धी

१. बीज तपासणी प्रयोगशाळेस शासन मन्यता प्राप्त करणे

२. शेतकऱ्यांची भविष्यातील विद्यापीठाने विकसीत केलेल्या विविध पिकांच्या वाणांची मागणी लक्षात घेऊन दर्जेदार बियाणे बीजोत्पादन वाढविणे.

३. शेतकऱ्यांची विद्यापीठान विकसीत केलेल्या विविध पिकांच्या वाणांची मागणी लक्षात घेता शेतकरी बीजोत्पादक गट/शेतकरी बीजोत्पादक कंपणी / खाजगी बीजोत्पादक कंपणी यांना प्रोत्साहन देऊन बीजोत्पादन कार्यक्रमामध्ये सहभागी करुन घेणे.

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाहय झालेला नॉन-प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करुन उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा.

१. बिज संशोधन प्रयोगशाळा बळकटीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या " सब-मिशन ऑन सीड ॲन्ड प्लॅन्टींग (एसएमएसपी)" या योजनेअंतर्गत केलेला आहे.

२. चालु योजनांच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी रिक्त जागांवर नियुक्ती करणे आवश्यक आहे.

## ५. प्रादेशिक ऊस संशोधन केंद्र, वसमतनगर, ता. वसमत जि. हिंगोली

१. संशोधन केंद्राचे नाव व पत्ता :- प्रादेशिक ऊस संशोधन केंद्र, वसमतनगर, ता. वसमत जि. हिंगोली.

२. स्थापना वर्ष :- १९६६

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र व इतर सुविधा :

क्षेत्र :- २६.२८ हेक्टर

इतर सुविधा :- ट्रॅक्टर, पुरातन बारवं, (विंधन विहिर), कुपनलिका.

४. मनुष्यबळ ( प्रकल्प निहाय मंजुर, सद्या भरलेले व रिक्त पदे) :-

मंजूर पदे :- ३८ भरलेली पदे :- १९ रिक्त पदे :- १९

इतर कार्यालयात प्रतिनियुक्तीवर :- ०७

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्देश व त्यानंतर झालेला बदल :

- ऊस पिकाच्या प्रयोगाअंतर्गत नव्याने विकसीत केलेल्या ऊसाच्या विविध वाणांची मराठवाड्याच्या वातावरणात उत्पादनक्षमता तपासणे.
- ऊसाचे कृषिविद्या शाखीय विविध प्रयोग राबविणे.
- ऊसाच्या नव्यानेच प्रसारीत करण्यात आलेल्या नवीन वाणांचे दर्जेदार बेणे शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे.

उपरोक्त उद्देशामध्ये बदल झालेला नाही.

६. पूर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प :

प्रादेशिक ऊस संशोधन केंद्र , वसमतनगर हे ऊसाच्या अखिल भारतीय समन्वीत संशोधन प्रकल्पाचे ऐच्छीक केंद्र, (Voluntary Centre) आहे. प्रतीवर्षी या संशोधन केंद्रात ऊसाचे आयव्हीटी, एव्हीटी -I एव्हीटी -II व खोडवा ऊस प्रयोग इ. प्रयोग राबविण्यात येतात. या प्रयोगाचे निष्कर्ष मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव जि. सातारा, ऊस प्रजनन संस्था (SBI) कोईमतुर व प्रकल्प संचालक, लखनौ यांना पाठविण्यात येतात.

७. केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम उदा. बिजोत्पादन, रोपवाटिका इ.:

प्रादेशिक ऊस संशोधन केंद्र, वसमतनगर या केंद्राच्या प्रक्षेत्रावर खरीप हंगामामध्ये सोयाबीन या पिकाचे पैदासकार बिजोत्पादन घेतले जाते. तसेच रब्बी हंगामामध्ये हरभरा व गहू या पिकाचे पैदासकार बिजोत्पादन घेतले जाते. याशिवाय खरीप हंगामामध्ये ज्वारी व पेरसाळ या पिकाचे तर रब्बी हंगामामध्ये रब्बी ज्वारी व गहू या पिकाचे बहुस्थानीय प्रयोग घेण्यात येतात.

८. गेल्या पाच वर्षांत केंद्रावरुन केलेल्या / केंद्राचा सहभाग असणाऱ्या महत्वाच्या शिफारसी / उपलब्धी : निरंक

९. शेतकऱ्याच्या सद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत? यासंबंधी सुचना :

या संशोधन केंद्रावर शेतकऱ्यांना ऊसाच्या नवीन वाणांचे दर्जेदार बेणे उपलब्ध करुन देण्यासाठी बेणेमळा निर्मिती करणे आवश्यक आहे.

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाह्य झालेला नॉन-प्लॅन (अनिवार्य) प्रकल्प बंद करुन उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा :

प्रादेशिक ऊस संशोधन केंद्र, वसमतनगर या कार्यालयात कृषिविद्यावेत्ता (Agronomist) हे एकमेव शास्त्रज्ञाचे पद मंजूर आहे. बदलत्या वातावरणात ऊसाचे मराठवाड्याच्या वातावरणास अनुरुप अधिक उत्पादनक्षम व विविध किड आणि रोगांना प्रतिकारक असे ऊसाचे नवीन वाण तयार करण्यासाठी या संशोधन केंद्रास ऊस पैदासकार (Sugarcane Breeder), किटकशास्त्रज्ञ (Entomologist), तसेच रोगशास्त्रज्ञ (Plant Pathologist) ही पदे मंजूर करणे आवश्यक आहे.

या कार्यालयास उपलब्ध मनुष्यबळ अतिशय कमी आहे. तसेच आकस्मिक निधी उपलब्ध नाही. प्रती वर्षी रुपये ३,००,०००/-आकस्मिक निधी (Contingency fund) या कार्यालयास प्रयोग राबविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावा.

# मका संशोधन केंद्र, सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत मौजे कोटनांद्रा व डोईफोडा, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर येथे मका संशोधन केंद्र स्थापन करण्यास दि. २८/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर संशोधन केंद्रासाठी आवश्यक २१  व बाहय स्त्रोताद्वारे १८ पदासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर संशोधन केंद्रासाठी रू. २२१८.०० लाख निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर संशोधन केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. या संशोधन केंद्राचे प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. मका पिकाचे विविध अनुवांशिक सामुग्री (जर्मप्लाझम) गोळा करणे व अधिक उत्पादन देणारे संकरीत वाणांची निर्मिती करणे.
२. जैवसंपृक्त वाणांची निर्मिती करणे.
३. किड व रोगास प्रतिकारक वाणांची निर्मिती करणे.
४. सुधारित लागवड तंत्रज्ञान विकसील करणे.
५. एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तंत्रज्ञान विकसीत करणे.
६. सुधारित तंत्रज्ञान शोधुन प्रात्याक्षिकाद्वारे शेतकऱ्यांना माहिती देणे.
७. मका पिकाची बहुउपयोगिता (औद्योगिक उपयोग) शेतकऱ्यांस माहिती देणे.

## ६. बिज प्रक्रिया केंद्र, वनामकृवि, परभणी

१. संशोधनकेंद्रनाव, पत्ता :- बिज प्रक्रिया केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी

२. स्थापना वर्ष :- १९७२

३. संशोधन केंद्रावर असलेले क्षेत्र आणि इतर सुविधा – बियाणे साठवणुक गोदाम - १०.

बिज प्रक्रिया मशिनरी- ०२ युनिट

४) मनुष्यबळ प्रकल्प निहाय मंजुर, सद्या भरलेली व रिक्त पदे

| **योजनेचे नाव** | **मंजुर पदे** | **भरलेली पदे** | **रिक्त पदे** |
|---|---|---|---|
| बिज प्रक्रिया केंद्र | **०४** | **०३** | **०१** |

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्येश व त्यातनंतर झालेले बदल.
विद्यापीठ अंतर्गत बिजोत्पादनाच्या उत्पादित बियाण्यावर प्रक्रिया करुन विविध बिजोत्पादक संस्थांना मुलभुत बियाणे पुरवठा केला जातो.

६. पूर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प : विविध बिजोत्पादक संस्थांना मुलभुत बियाणे पुरवठा केला जातो.

७. केंद्रावर चालू असलेले इतर उपक्रम उदा. बिजोत्पान, रोपवाटीका इ.

८. गेल्या पाच वर्षात केंद्रा वरुन केलेल्या / केंद्राचा सहभाग असणा-या महत्वाच्या शिफारसी/ उपलब्धी.

९. शेतक-यांच्या संद्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन.

१०. संक्षित संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय कोणता कालबाहय झालेला नॉन-प्लॅन अनिवार्य प्रकल्प बंदकरुन उपलब्ध करता येईल यांचा स्पष्ट उल्लेख करावा.

## ७. गळीत धान्ये संशोधन उपकेंद्र, अंबाजोगाई

१. कृषि संशोधन केंद्राचे नाव व पत्ता - गळीत धान्य संशोधन उपकेंद्र, अंबाजोगाई

२. स्थापना वर्ष - १९७२

३. संशोधन केंद्राचे असलेले कार्यक्षेत्र आणि इतर सुविधा – १५.३९ हेक्टर क्षेत्र कार्यालयाची इमारत, ३ खोल्या, भांडार, ट्रॅक्टर शेड, बैलगोठा, थ्रेसींग यार्ड व पाण्याचा हौद

४. मनुष्यबळ -

| योजनेचे नाव | मंजुर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| गळीत धान्य संशोधन उपकेंद्र | **०९** | **०३** | **०६** |

५. संशोधन केंद्राचा मुळ उद्देश व त्यात नंतर झालेले बदल - बिजोत्पादन व पीक चाचणी प्रयोग घेणे

६. पुर्ण झालेले व कार्यरत असलेले संशोधन प्रकल्प – निरंक

७. केंद्रावर चालु असलेले इतर उपक्रम - बिजोत्पादन व पिक चाचणी प्रयोग

८. गेल्या पाच वर्षात केंद्रावरुन केलेल्या/केंद्राचा सहभाग असणा-या महत्वाच्या शिफारशी/उपलब्धी - निरंक

९. शेतक-याच्या सध्याच्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता सुरु असलेल्या संशोधन प्रकल्पात काय बदल करावेत या संबंधी सुचना - निरंक

१०. संक्षिप्त संशोधन प्रकल्प सादर करावा. यासाठी लागणारे मनुष्यबळ आणि आर्थिक सहाय्य कोणता कालबाहय झालेला नॉन प्लान (अनिवार्य) प्रकल्प बंद करुन उपलब्ध करता येईल याचा स्पष्ट उल्लेख करावा. - निरंक

# मका संशोधन केंद्र, सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत मौजे कोटनांद्रा व डोईफोडा, ता. सिल्लोड, जि. छ. संभाजीनगर येथे मका संशोधन केंद्र स्थापन करण्यास दि. २८/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर संशोधन केंद्रासाठी आवश्यक २१ व बाहय स्त्रोताद्वारे १८ पदासाठी मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर संशोधन केंद्रासाठी रू. २२१८.०० लाख निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर संशोधन केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. या संशोधन केंद्राचे प्रमुख उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. मका पिकाचे विविध अनुवांशिक सामुग्री (जर्मप्लाझम) गोळा करणे व अधिक उत्पादन देणारे संकरीत वाणांची निर्मिती करणे.
२. जैवसंपृक्त वाणांची निर्मिती करणे.
३. किड व रोगास प्रतिकारक वाणांची निर्मिती करणे.
४. सुधारित लागवड तंत्रज्ञान विकसील करणे.
५. एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन तंत्रज्ञान विकसीत करणे.
६. सुधारित तंत्रज्ञान शोधुन प्रात्याक्षिकाद्वारे शेतकऱ्यांना माहिती देणे.
७. मका पिकाची बहुउपयोगिता (औद्योगिक उपयोग) शेतकऱ्यांस माहिती देणे.

## सोयाबीन संशोधन, प्रशिक्षण व प्रक्रिया उपकेंद्र, धर्मापुरी, परळी वैजनाथ, जि. बीड

मौजे, धर्मापुरी ता. परळी वैजनाथ, जि. बीड येथे सोयाबीन संशोधन, प्रशिक्षण व प्रक्रिया उपकेंद्र स्थापन करण्यास दि. २७/०२/२०२४ रोजी शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर संशोधन उपकेंद्रास १५ पदाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच या संशोधन उपकेंद्रास रू. २४०५.३० लाख निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर संशोधन उपकेंद्राची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. सोयाबीन पिकाचे विविध अनुवांशिक सामुग्री (जर्मप्लाझम) गोळा करणे व अधिक उत्पादन देणारे सरळ वाणांची निर्मिती करणे.
२. जास्त प्रमाण असणाऱ्या तेलाचे व प्रथिनांचे वाणांची निर्मिती करणे.
३. किड, रोगास व कमी ओलाव्यामध्ये प्रतिकारक्षम वाणांची निर्मिती करणे.
४. बदलत्या हवामानावर आधारीत सोयाबीन उत्पादन तंत्रज्ञान विकसित करणे. संशोधन प्रक्षेत्रावर प्रयोग घेणे व शेतकऱ्यांच्या शेतावर प्रात्याक्षिके घेणे.
५. इतर हंगामात लागवडीसाठी सोयाबीन वाणांची निवड करणे आणि त्यांची योग्यता पडताळणी करणे.
६. सोयाबीन आधारीत पिक पध्दती विकसित करणे. विशेषतःकमी खर्च, किफायतशीर शेतीतून निव्वळ उत्पन्न वाढवणे आणि शाश्वत सोयाबीन शेती मॉडेल विकसित करणे.
७. सोयाबीन आधारित अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान विकसित करणे.
८. नविन पिक पध्दतीसह सोयाबीन पिक उत्पादन घेणारे शेतकरी, विस्तार कामगार, स्वयंसेवी संस्था सरकारी संस्था आणि इतर संस्थाना प्रशिक्षण देणे.
९. कृषि यांत्रिकीकरणाचा अवलंब करणे.
१०. अलीकडे प्रसारीत झालेल्या वाणांचा दर्जेदार उत्पादन कार्यक्रम राबविणे व तेल बियांमध्ये स्वंयपूर्ण होण्यासाठी मोठया क्षेत्रावर प्रसार करणे.